| Published Date: | 21st Feb 2023 | Publication: | Loksatta |
|---|---|---|---|
| Edition: | Mumbai | Page No: | 10 |
| Headline: L&T Financial Services Insta Loan disbursement records strong growth | | | |

# एल अ‍ॅण्ड टी फायनान्शियल सर्व्हिसेसच्या तत्काळ कर्ज वितरणात विक्रमी वाढ

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** बँकेतर वित्तीय कंपन्यांच्या क्षेत्रातील आघाडीच्या एल अ‍ॅण्ड टी फायनान्शियल सर्व्हिसेसने तत्काळ कर्ज (इन्स्टा लोन) वितरणात अतिशय भरभक्कम वाढ नोंदवली आहे. लक्ष्य २०२६ या धोरणात्मक आराखड्यानुसार ग्राहककेंद्रित कर्ज व्यवसायातील प्रमुख कंपनी बनण्याच्या दिशेने सुरू कंपनीची वाटचाल सुरू आहे, असे एल अ‍ॅण्ड टी फायनान्शियल सर्व्हिसेसचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्याधिकारी दीनानाथ दुभाषी यांनी सांगितले.

सप्टेंबर २०२२ मध्ये या कर्ज प्रकाराला सुरुवात झाली आणि तत्काळ कर्ज वितरणात जानेवारी २०२३ अखेर कंपनीने ९१ कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. या श्रेणींतर्गत ग्राहकांच्या अर्जावर अवघ्या सात मिनिटांत प्रक्रिया केली जाते व त्यांना एक ते चार वर्षे परतफेड मुदतीचे, ५० हजार ते सात लाख रुपयांदरम्यानचे कर्ज मिळू शकते.